**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त बार्टीमार्फत समता सप्ताहाचे आयोजन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत दि ८/०४/२०१८ ते दि. १४/०४/२०१८ दरम्यान महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त समता सप्ताह व दि १४ एप्रिल २०१८ हा दिवस ज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. सदर कालावधीत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्या येणार आहे. सदर कार्यक्रमांचा तपशिल खालीलप्रमाणे,

१. दि. १४/४/२०१८ रोजी स. १० ते रात्रौ ८ या वेळेत बार्टी, मुख्यालय, पुणे येथे विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती देणाऱ्या स्टॉल्सचे आयोजन.
    I. पुस्तक वितरण स्टॉलचे आयोजन:- पुस्तकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रमुख मित्र मानत. अशा ज्ञानसागराच्या १२७ वया जयंतीनिमित्त थोर समाजसुधारकांच्या जीवनकार्यावर आधारित नामवंत लेखकांनी लिहिलेली पुस्तके ८५ टक्के सवलतीने बार्टीच्या पुणे येथील मुख्यालयात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यात भारतीय संविधान, महामानव, धम्मपद, महाडचा मुक्तिसंग्राम, अण्णाभाऊ साठे गौरवग्रंथ या व इतर अनेक दर्जेदार पुस्तकांचा समावेश आहे.
    II. शासनाच्या विविध विभागांच्याव महामंडळांमार्फत वंचित घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देणाऱ्या स्टॉल्सचे आयोजन. उदा.
        a. महिला व बालकल्याण,
        b. समाजकल्याण,
        c. साहित्यरत्न लोकशहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,
        d. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमती विकास विकास महामंडळ,
        e. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ इ.

२. समतादूतांमार्फत महाराष्ट्रभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रबोधनात्मक पथनाटय व करीअर मार्गदर्शन

३. समता प्रतिष्ठान, नागपूर मार्फत दीक्षाभूमी, नागपूर येथे समता सप्ताहा दरम्यान पुस्तक वितरणाकरीता बार्टीमार्फत पुस्तक पुरवठा करण्यात आला आहे.

४. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत प्रकाशित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वावर आधारित लेख असणाऱ्या जयंती विशेषांकाच्या प्रति समतादूतांमार्फत विविध समाजघटकांना वितरित करण्यात येणार आहेत.